महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश

क्रीडांगणाचे मैदानाचा राष्ट्रीय व धार्मिक कारणासाठी वापर अनुज्ञेय करतांना विचारात घ्यावयाच्या शर्ती व अटी.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० सप्टेंबर, १९९७

निदेश

क्रमांक: टिपीवी ४३९७/२००६/प्र.क्र. १३२/९७/नवि ११.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६

ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना [सुधारणा] अध्यादेश १९९७ [सन १९९७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४] अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ [सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७] [ह्यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख केलेला आहे.] चे कलम ३७ नंतर नवीन कलम "३७ अ" समाविष्ट करण्यात आलेले असून या नवीन कलमानुसार राज्य शासनास आणि नियोजन प्राधिकरणास कोणत्याहीसंघटनेस व्यक्तींच्या विकासाला, किंवा संघाला या कलमात नमूद केलेल्या शर्ती व अटींवर कोणत्याही क्रिडांगणाचा किंवा त्याच्या भागाचा वापर विहीत कालावधीसाठी स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आणि त्या प्रकारच्या राष्ट्रीय महत्वाच्या प्रसंगी राष्ट्रीय महापुरूषांच्या जयंती व पुण्यतिथीच्या प्रसंगी आयोजित करण्यात येणाऱ्या समारंभासाठी आणि धार्मिक समारंभासाठी करण्याची परवानगी देता येते.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाचे सदर कलम ३७ अ ची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी अशा क्रिडांगणांचा धार्मिक व राष्ट्रीय समारंभासाठी उपयोग अनुज्ञेय करतांना काही स्वयंस्पष्ट शर्ती व अटी समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत आहे,

आणि आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे उपकलम [१] कलम १५४ व कलम ३७ अ चे तरतूदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणास खालील प्रमाणे निदेश

कृ. मा. प.

देण्यात येत आहेत.

निदेश

एक :- "उक्त अधिनियमाचे कलम ३७ अ नुसार क्रिडांगणाच्या धार्मिक राष्ट्रीय समारंभासाठी वापर अनुज्ञेय करतांना खालील शर्ती/अटींचेही पालन करण्यात यावे.

[१] क्रिडांगणाचा वाणिज्य वापरासाठी उपयोग अनुज्ञेय राहणार नाही.

[२] कलम ३७ अ मध्ये नमूद केलेल्या धार्मिक संस्थांचे धार्मिक समारंभास अशा समारंभावर करण्यात आलेल्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी "ना नफा - ना तोटा" तत्वावर प्रवेश फी, देणगी जमा करण्यास अनुमती देण्यात येईल.

[३] या अनुषंगाने सर्व संबंधीत नियम, नियमावली, आदेश, न्यायालयाचे आदेश ज्यामध्ये मुंबई पोलिस अधिनियमाखाली जारी केलेल्या आदेशांचाही समावेश आहे त्याचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

[४] लाऊड स्पिकरचा वापर रात्री ११.३० नंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये अनुज्ञेय होणार नाही.

दोन :- उपरोक्त निदेश हे तात्काळ अंमलात आणण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,

[ के. नलिनाक्षन् ]
शासनाचे प्रधान सचिव.

प्रत,

१. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे [पू], मुंबई ५१.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण वांद्रे [पू], मुंबई ५१.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, वांद्रे [पू], मुंबई ५१.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, म.औ.वि.मं. अंधेरी [पू].

.. .. ३